# प्रायोरिटी

जुई शांतपणे खिडकीपाशी बसली होती. चहाचा मग हातात, पण ओठांना लावायची इच्छा होत नव्हती तिची. आईच्या तोंडाचा पट्टा अखंड सुरू होता. तेच तेच ऐकुन कंटाळली होती जुई. काल संध्याकाळपासून आई हा एकच विषय चघळत बसली होती. सतत बोलत होती. आईची मनस्थिती जुईला समजत होती, पण तिचा नाईलाज होता.

आई फणकारलीच आता. बाईसाहेब, आज ऑफिस नाही वाटतं. निवांत चाललंय सगळं. का आता नोकरी पण सोडायची आहे? कसं होणार ह्या मुलीचं? काय तर म्हणे त्याला माझ्यासाठी वेळच नाही, म्हणून लग्नाला नकार देऊन आली. महिन्यावर लग्न आलंय, आणि ह्या पोरीनं लग्न मोडून टाकलंय. कुठे तोंड दाखवायला म्हणून जागा ठेवली नाही. आईच्या ह्या वाक्यासरशी जुईच्या डोळ्यात टचकन पाणी आलं. माझी आई आहे ना ही? मग माझं मन का समजू शकत नाही? माझ्या आनंदापेक्षा, माझ्या भविष्यापेक्षा लोकं महत्वाची आहेत हिच्यासाठी? मला काय वाटतंय, याचा विचार सुद्धा तिच्या मनाला शिवत नाहीये. मी लग्न मोडलं. हो मोडलं! मला काहीच वाटत नसेल का त्याचं? मी नव्हती का पाहिली स्वप्न? गेल्या पाच महिन्यातल्या भेटी, संवाद, स्वप्न, सगळंच डोळ्यांसमोर एखाद्या चलत चित्राप्रमाणे सरकू लागलं.

पहाता क्षणीच गौरव आवडला होता जुईला. हाच तो, ज्याच्यासाठी आधीची तीन स्थळं आपण नाकारली, असंच वाटलं तिला गौरवला पाहून. त्याच्याकडून ही होकार आला. झालं! सगळीकडे आनंदच आनंद. रीतसर सगळी बोलणी झाली, साखरपुडा झाला आणि महिन्यांनतरचा लग्नाचा मुहूर्त ठरला. गौरव एका मल्टीनॅशनल कंपनीमध्ये उच्च पदावर नोकरी करत होता. जुईला त्याचा फार अभिमान वाटत असे. त्यांच्या ज्या काही दोन-तीन भेटी झाल्या होत्या, त्यात तिने त्याला तसं बोलून सुद्धा दाखवलं होतं. खूप खुश होती ती. गौरवचं सुद्धा तिच्यावर प्रेम होतं.

लग्न ठरल्यापासून सुरुवातीचा एक महिना असा छान आनंदात, स्वप्नात गेला. नंतर मात्र हळू-हळू गौरव तिच्याशी बोलायचा कमी झाला. तिला कल्पना होती, तो सतत बिझी असतो, त्याच्या पदाला साजेसं काम असतंच त्याला आणि ते तो तिळ्या पूर्ण करतो. ह्याचा सार्थ अभिमान सुद्धा होता तिला. पण आताशा तो तिच्याशी बोलेनासा झाला. फोन केला तर उचलायचा नाही, उचललाच तर बिझी आहे. असं सांगून बंद करायचा, मेसेजचा साधा रिप्लाय सुद्धा नाही. का बरं असं वागत असावा तो? ती सारखा विचार करत असे. मान्य आहे, खूप काम असतं, तरी चोवीस तासातून पाच मिनीटं सुद्धा मोकळी नसतात, हे पटत नव्हतं. कुठेतरी वाचल्याचं अचानक तिच्या स्मरणात आलं. There is nothing like busy in this world, everything depends upon priorities. ह्या मुद्द्यावरुन मन हटायला तयार नव्हतं कारण वाचल्याबरोबर हा मुद्दा तिला पटला होता. माणूस हेच तर करत असतो. त्याच्या दृष्टीने जे महत्वाचं असतं, त्याला प्रथम प्राधान्य देतो. त्या गोष्टीसाठी जीवाचा आटापीटा करुन वेळ काढतो. बाकीच्या गोष्टी दुय्यम स्थानावर असतात. वेळ मिळाला तर करु, ह्या कॅटेगरीमध्ये. म्हणूनच गौरवचं असं वागणं, तिला टोचत होतं. ज्या अर्थी तो आपल्याकरता दिवसभरातून पाच मिनीटं सुद्धा काढू शकत नाही, त्या अर्थी आपण त्याच्या प्रायॉरिटी लीस्ट मध्ये बसतच नाही. लग्नापूर्वी जर ही अवस्था आहे, तर नंतरचं चित्र कसं असेल, ह्याची कल्पना न केलेलीच बरी.

काही दिवस ह्या गोष्टीवर विचार करुन काल ती ठामपणे निर्णय घेऊन, गौरवला भेटायला गेली, कोणत्याही पूर्वकल्पनेशिवाय. तिला पाहून तेंव्हा सुद्धा गौरव हेच म्हणाला .... अगं अशी न सांगता का आलीस ? मी कामात आहे आत्ता. पण जुई मात्र सोक्ष-मोक्ष लावायचा हे मनाशी ठरवूनच गेली होती. ती म्हणाली, तू खुशाल काम करत रहा, माझी काहीच तक्रार नसेल, कारण ज्या माणसाला माझ्यासाठी वेळच नाही, त्याच्या बरोबर आयुष्य ढकलण्यात मला काहीच स्वारस्य नाही. इतकंच सांगायला आले होते. तू तुझं काम करु शकतोस, इतकं बोलून ती तडक निघून गेली.

सगळं आठवून तिला पुन्हा-पुन्हा भरून येत होतं. पण ती स्वाभिमानी होती, म्हणूनच इतका मोठा निर्णय घेऊनही ती शांत होती. कालपासून हे सारं आईला समजावून झालं होतं, पण आईला तिचं मन समजत नव्हतं, ह्याचंच काय ते दुःख होतं. आईने आत्ता मला आधार द्यायला हवा खरं तर, पण - - - - - -

दाराची बेल वाजली आणि जुई आपल्या विचारांच्या तंद्रीतून बाहेर आली. आईने तोंडाचा पट्टा न थांबवताच दार उघडण्याचं काम केलं; आणि समोर गौरवला पाहून तिची वाचाच बसली. काही न समजून ती तशीच दारात उभी राहीली. काही क्षण शांततेत गेले तसं गौरव म्हणाला, जुईला भेटायचं आहे. त्याचे शब्द कानावर पडले आणि आईने भानावर येऊन त्याला आत येण्यासाठी वाट करून दिली. जुई----! गौरवचा अनपेक्षित आवाज कानावर पडला, तसं जुईने मागे वळून पाहीलं. तिने फक्त पाहीलं त्याच्याकडे, काहीच बोलली नाही. तिच्या नजरेला नजर द्यायचं धाडस त्याला होतच नव्हतं, तरी बोलायची वेळ आता त्याचीच होती.

चुकलं माझं! त्याने सुरुवात केली. ती शांतच. तो पुन्हा म्हणाला, खरंच चुकलं आहे माझं! तुला दुखवण्याचा माझा हेतू नव्हता, पण होत गेलं तसं माझ्याकडून. कामाच्या व्यापात इतका गुरफटलो, की तू सुद्धा महत्वाची आहेस, हे माझं मलाच कळलं नाही. तो सोडून गेलीस आणि जाणीव झाली की आपण काय गमावतोय. सामान्य माणूस आहे मी. हरवल्यानंतरच त्या वस्तूचं, व्यक्तीचं महत्व समजून येणारा. तू समजून घे मला. खरं तर असं म्हणायचा अधिकार नाही मला. समजून घेशील का?

जुई शांत आणि स्तब्ध होती. गौरव पुन्हा म्हणाला, जुई बोल ना काही तरी. ती शांतपणे उत्तरली, मला विचार करायला वेळ हवा आहे - - - - -



सौ. गौरी मंदार गानू.